Open Access
उदयगिरी - बहुभाषिक इतिहास संशोधन पत्रिका
(A Bimonthly, Refereed, & Peer Reviewed Journal of History)
Published by: AAASSHER, Mumbai, (MS) India
Journal homepage: https://udayagiri.aaassher.org/
ISSN (Online): 2583-8423
Volume 1, Issue 5, December 2023; Pages 85 – 87
DOI: 10.5281/zenodo.10072547

Original Research Article

# महात्मा गांधी आणि अहिंसा

प्रा. डॉ. सूर्यकांत सावंत

विभागप्रमुख, इतिहास विभाग, शिवाजी महाविद्यालय, उदगीर जि. लातूर ४१३५१७ महाराष्ट्र, भारत

*Corresponding author E-mail*: gaurisawant55@gmail.com

Received: 10 October, 2023 | Accepted: 23 October, 2023 | Published: 26 October, 2023

## प्रस्तावना

अहिंसेच्या मार्गाने एखाद्या देशाला स्वातंत्र्य मिळविता येऊ शकते. अशी कल्पना जगात कोणालाही नव्हती. परंतु महात्मा गांधीजींनी ती प्रत्यक्षात उतरवली. आज संपूर्ण जगात 2 ऑक्टोबर हा महात्मा गांधीजींचा जन्मदिवस 'जागतिक अहिंसा दिवस' म्हणून साजरा केला जातो. दक्षिण आफ्रिकेमध्ये नेल्सन मंडेला यांच्याद्वारे वर्णविरोधी आंदोलनाच्या यशस्वीतेसाठी गांधीचे अहिंसाविषयक विचारच कारणीभूत ठरले. अमेरिकेचे माजी राष्ट्राध्यक्ष बराक ओबामा यांनी महात्मा गांधीजींना आपले प्रेरणास्रोत मानले. आज जगातील अनेक समस्यांची सोडवणूक गांधींचे अहिंसाविषयक विचार आणि तत्त्वज्ञान सोडवू शकते यात शंका नाही.

मानवाचे क्रोध आणि असहिष्णुता हे खरे शत्रू आहेत. कमजोर व्यक्ती कधीही माफी मागत नाही पण क्षमा करणे हे एका ताकदवान व्यक्तीचे विशेष आहे. सत्य, अहिंसा, अस्तेय, अपरिग्रह, ब्रह्मचर्य ही नीतीतत्त्वे जगातील सर्व धर्म सांगतात. मानवाला जीवन जगायचे असेल तर या नीतीतत्त्वाचा अंगिकार केल्याशिवाय पर्याय नाही. सत्य आणि अहिंसा हे समाजाचे वास्तव मूल्य आहे.

महात्मा गांधीनी अहिंसा हे तत्त्व कस्तुरबा गांधी यांच्याकडून घेतले होते. यातून गांधीजींचे मन बदलले. एखाद्या परिस्थितीवर मात करण्यासाठी गांधीजींनी अहिंसा हाच एकमेव मार्ग पत्करला होता. देश, समाज आणि लोक अहिंसेच्या तत्त्वाचा अवलंब करतील आणि आत्मसन्मानाने समाज घडवतील असा गांधीजींचा विश्वास होता. गांधींचे अहिंसाविषयक विचार आणि तत्त्वान संपूर्ण मानवजातीला दिलेली एक महत्त्वाची अनमोल देणगी म्हणावी लागेल.

अहिंसेच्या माध्यमातून समाजाचे प्रश्न सार्वजनिक चर्चेच्या केंद्रस्थानी आणता येतात. अहिंसा ही अत्यंत सकारात्मक संकल्पना आहे. याद्वारे शत्रुलाही जिंकता येऊ शकते. अहिंसेत शरीरयष्टी, हत्यारे, साधन सामग्री याची आवश्यकता नसते. म्हणून त्यांची अहिंसा चळवळ भारतातील सर्वसामान्य लोकांपर्यंत प्रचंड लोकप्रिय झाली.

**अर्थ**

१. अहिंसेचा साधा-सोपा अर्थ 'हिंसा न करणे' हा आहे.
२. गांधी सुत्रानुसार अहिंसेची व्याख्या-"सर्वप्राणिमन: कार्यहंसानिवृत्तिर" म्हणजेच "सर्व प्राणीमात्रांच्या शारीरिक, मानसिक हिंसेचे निराकारण म्हणजे अहिंसा होय."
३. महात्मा गांधीजींच्या मते, "अहिंसा आणि सत्य ही माझी दोन फुफ्फुसे आहेत."

**अहिंसा**

म. गांधीजींच्या मते, सैद्धांतिक पातळीवर अहिंसा हेच सर्वश्रेष्ठ अस्त्र असले तरी प्रत्येकालाच ते पेलेल असेही नाही. निष्कलंक चरित्र, स्वेच्छापूर्वक स्वीकारलेले दारिद्र्य, सत्य, निर्भयतावादी गुण, साधेपणा, श्रमवृत्ती, दलितांविषयी सेवाभाव इ. गोष्टी ज्यांनी खडतर तपश्चर्या करून संपादन केल्या असतील तेच या अस्त्राचा समर्थपणे वापर करू शकतात. जगातील अशांती, युद्ध यावर गांधीजींचे अहिंसात्मक तत्त्वज्ञानच उपयोग पडू शकते यात शंका नाही. म. गांधीचे अहिंसात्मक विचार जगासाठी मार्गदर्शक ठरले

स्वत: महात्मा गांधीनीच म्हटले होते की, जीवनाच्या प्रत्येक क्षेत्रात अहिंसेचा प्रयोग माझ्याकडून झालेला आहे, घरात, संस्था, आर्थिक व राजकीय क्षेत्रात सर्व ठिकाणी अहिंसा प्रयोगात आणली आहे. मला असा क्षण आठवत नाही, तेथे अहिंसा अयशस्वी झाली आहे. जिथे अयशस्वी झालेली दिसून आली त्या ठिकाणी अयशस्वीतेचे कारण माझी दुर्बलता आहे हे मी समजले होते.

"अहिंसा सत्य अस्तेय ब्रह्मचर्य असंग्रह
शरिरश्रम अस्वाद सर्वत्र भयवर्जन
सर्वधर्मी समानत्व स्वदेशी स्पर्शभावना
ही एकादश सेवावी नम्रत्वे व्रतनिश्चये"

अहिंसा म्हणजे कोणालाही कठोर वा कटू शब्दात न बोलणे, द्वेष, क्रोध, क्रूरता इत्यादीपासून दूर राहणे होय. विशिष्ट अर्थाने आपल्या शत्रूविषयी देखील वाईट विचार न ठेवणे म्हणजे अहिंसा होय. अहिंसेचा सकारात्मक अर्थ सर्वच मनुष्य व प्राण्याविषयी प्रेम, दया करुणा आणि सद्भावना राखणे असा आहे. महात्मा गांधीनी आयुष्यभर सत्य आणि अहिंसा या तत्त्वांचा पुरस्कार केला. त्या तत्त्वानुसार ते जगले. त्यांनी अहिंसा व असहकार चळवळीच्या माध्यमातून भारताला स्वातंत्र्य मिळवून दिले. या अहिंसक मार्गानेच किंवा त्यांच्या तत्त्वज्ञानामुळे संपूर्ण जगाला प्रेरित केले आहे.

अहिंसा व्रताचा विचार हा तसा नवीन नसून प्राचीन काळापासून या व्रताचा विचार मांडला गेला आहे. या व्रताच्या पालन करणाऱ्या व्यक्ती पूर्वी होत्या पण त्यांची व्रतसाधना वैयक्तिक होती. मोक्षप्राप्तीसाठी होती. त्यात सामाजिक सेवा व सामाजिक कर्तव्यांचा समावेश नव्हता. महात्मा गांधीनी मात्र या व्रताच्या विचारात वैयक्तिक मोक्षापेक्षा साधना आणि सामाजिक कर्तव्य यांचा मेळ घालून या व्रताला नवीन जोड दिली. त्यातून मोठे मौलिक कार्य सत्य अहिंसा या व्रतामधून सर्वोदयाची संकल्पना महात्मा गांधीजींनी मांडली. म्हणून अहिंसा तत्त्वाला गांधीजींच्या जीवनात अत्यंत महत्त्वाचे स्थान होते.

महात्मा गांधीनी सत्य आणि अहिंसेचे प्रयोग स्वत:च्या जीवनात केले. म्हणूनच त्यांना 'सत्याचे प्रयोग' म्हणून मान्यता मिळाली. त्यांनी अहिंसा हे तत्त्व नकारात्मक न स्वीकारता सकारात्मक अर्थाने स्वीकारले होते. सर्वांच्या प्रती प्रेम, आदरभाव आणि सत्याचा अनुभव ते अनुसरण करत असताना मांसाहाराचा त्याग, प्राणीमात्रांवर दया, ब्रह्मचर्य अस्तेय अपरिग्रह हे अहिंसेचे मार्ग होते. अहिंसा सत्याचा आत्मा आहे याच्याशिवाय मनुष्य पशू ठरतो. सत्याची जाणीव आणि अनुभूती गांधींनी अहिंसेमध्ये सांगितली आहे.

**निष्कर्ष**

गांधीजींनी आयुष्यभर अहिंसेचा मार्ग स्वीकारून व्यक्ती आणि समाजालाही तशीच शिकवण दिली. गांधीजींच्या अहिंसेच्या संकल्पनेत समतेचे तत्त्व केंद्रस्थानी आहे आणि सहिष्णूता व सामंजस्य अनुषंगिक आहे. कोणत्याही प्रकारचा प्रश्न हा हिंसा अथवा युद्धाच्या मार्गातून सुटणार नाही याची शिकवण त्यांच्या आचार आणि विचारांतून मिळते.

**संदर्भ सूची**

१. साधना साप्ताहिक, संपा. विनोद सिरसाट, गांधीजी आणि रवींद्रनाथ टागोर, सुरेश द्वादशीवार, 3 फेब्रु. 2014

२. नागोराव कुंभार, परामर्श, खंड 25, अंक 2 रा, ऑगस्ट-सप्टेंबर 2003

३. महात्मा गांधी जीवन आणि कार्यकाळ, लुई फिशर, अनु. वि.रा. जोगळेकर, साधना प्रकाशन, 2023

४. प्रमुख भारतीय राजकीय विचारवंत-डॉ.ना.य. डोळे

५. महात्मा गांधी और अहिंसा, रवींद्र कुमार, कल्पज पब्लिकेशन, नई दिल्ली

६. गांधी पराभूत राजकारणी आणि विजयी महात्मा-डॉ.रावसाहेब कसबे, लोकवाङ्मय गृह, मुंबई, 2023